# कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन

## सन २०१४-१५ वार्षिक अहवाल

**प्रस्तावना-**

प्रिय सभासद बंधु भगिनींना, सस्नेह नमस्कार,

कुष्ठरोग निवारण समितीचा सन २०१४-१५ चा वार्षिक अहवाल आपल्यासमोर ठेवीत आहे.

सन २०१४-१५ या अहवाल वर्षात विभागवार कार्याचा अहवाल स्वतंत्रपणे पुढे दिलेला आहे. अहवाल वर्षात ज्या महत्वाच्या घटना झाल्य त्या संक्षिप्त स्वरुपात सादर करीत आहोत.

कुष्ठरोग निवारण समितीने आपल्या हीरक वर्षानिमित्ताने काही संकल्प केले होते त्यामध्ये हीरक वर्षाच्या निमित्ताने विविध उपक्रमांसाठी निधी गोळा करणे, समितीच्या मुख्य कार्यालयाचे, पुनर्वसन कक्ष, विणकाम विभाग, कुष्ठरुग्ण निवासी इमारत इत्यादींचे नुतनीकरण करण्याचे ठरविले होते. आपणांस सांगावयास आनंद वाटतो की, संस्थेचे अध्यक्ष मा. चंद्रशेखर धर्माधिकारी व संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त व उपाध्यक्षा श्रीमती रक्षा मेहता यांच्या प्रयत्नांमुळे प्रसिध्द उद्योगपती श्री. राहुल बजाज यांनी बजाज फाऊंडेशन तर्फे रु.५०,००,०००/- देणगी दिली. या देणगीतून समितीचे मुख्य कार्यालय, कुष्ठरुग्ण पुनर्वसन कक्ष, कुष्ठरुग्ण निवासी इमारत व विणकाम विभाग इत्यादींचे नुतनीकरण पूर्ण करण्यात आले निसर्गोपचार केंद्राच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. कुष्ठरोग निवाारण समितीने केलेल्या आवाहनाला शांतिवन मित्र मंडळींनी, देणगीदारांनी उत्तम प्रतिसाद दिल्याने हिरक वर्ष निधीसाठी रु.२० लाखाहून अधिक निधी जमा झाला आहे. याबद्दल आम्ही सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसनाचे कार्य करणारे व दत्तपूर (वर्धा) या आश्रमाचे संस्थापक आद्य कुष्ठ सेवक कै. मनोहरजी दिवाण यांचे नांव शांतिवनातील नुकतेच नुतनीकरण केलेल्या कुष्ठरुग्ण पुनर्वसन कक्षाला देण्यात येऊन त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. कुष्ठरोग निर्मुलनाच्या कार्यात अनेक वर्षे कार्यरत राहून कुष्ठरुग्णांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महत्वाचे योगदान दिलेल्या, तपोवनाचे शिल्पकार, कुष्ठरोग महर्षि कै.डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांचे नांव कुष्ठरोग निवारण समितीच्या सभा कक्षाला देण्यात येऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

गांधी मेमोरिअल फाऊंडेशन, वर्धा या संस्थेचे संस्थापक कै.डॉ. रामचंद्र वारदेकर यांचे कुष्ठरोग निर्मुलनाच्या कामात महत्वाचे योगदान होते. कुष्ठरोगाबद्दलची माहिती संकलित करुन त्याचा शास्त्रीय अभ्यास केला. कुष्ठरुग्णांनी घरी राहून उपचार घ्यावेत असा त्यांचा आग्रह होता. यादृष्टिने कुष्ठरोगाबद्दलची समाजातील घृणा दूर करणे, गैरसमज दूर करणे यासाठी कै.वारदेकर यांनी सर्वेक्षण, शिक्षण व उपचार (एसईटी) हे उपक्रम

भारतभर चालवले. या उपक्रमाला भारत सरकारने मान्यता दिली एवढेच नव्हे तर जागतिक आरोग्य संघटनेनेही या उपक्रमाची दखल घेतली. सर्वार्थाने त्यांना एसईटी या उपक्रमाचे जनक म्हणावे लागेल. अशा या महान व्यक्तीचे ऋण व्यक्त करण्यासाठी कुष्ठरोग निवारण समितीने आपल्या मध्यवर्ती कार्यालयाला कै.डॉ.रामचंद्र वारदेकर यांचे नाव दिले आहे. कुष्ठरोग निवारण समितीच्या शांतिवन येथील कुष्ठरुग्ण वसाहतीला कुष्ठरोग निवारण समितीचे माजी अध्यक्ष कै.एस.एम.जोशी यांचे नाव देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

कुष्ठरोग निवारण समितीचे आरोग्य विभाग प्रमुख व कोषाध्यक्ष श्री.उदय ठकार यांना दि. ५ व ६ मे २०१५ रोजी अमेरिकेत कुष्ठरोग निर्मुलना विषयी निरनिराळ्या ठिकाणी व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले होते. हा त्यांचा दौरा यशस्वीपणे पार पडला. तसेच नोव्हेंबर २०१४ मध्ये श्री. उदय ठकार तीन दिवसीय आरोग्य परिषदेसाठी आयर्लंड येथे गेले होते.

अहवाल काळातील आनंददायक घटना म्हणजे कुष्ठरोग निवारण समितीच्या विश्वस्त व कार्याध्यक्षा श्रीमती मीराताई लाड यांना **झी मराठी** वाहिनीने **उंच माझा झोका जीवन गौरव पुरस्कार** देऊन गौरविले. समितीच्या निसर्गोपचार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. श्रीमती कुमुदताई जोशी यांना निसर्गोपचारातील त्यांच्या सेवेची दखल घेऊन केंद्र शासनाने **आयुष** या पुरस्काराने केंद्रीय राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्या हस्ते गौरविले. उपाध्यक्षा श्रीमती रक्षा मेहता यांना फाऊंडेशन असोसिएशन ऑफ इनरव्हील इन इंडीया व श्रीलंका यासाठी पुरस्कार देण्यात आला इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, नवी दिल्ली यांच्या तर्फे निसर्गोपचाराच्या सेवेबद्दल डॉ.सुधाकर खराडे यांचा सत्कार करण्यात आला.

अशाप्रकारे चांगल्या घटना घडत असतानाच मनाला विषन्न करणाऱ्या, सामाजिक क्षेत्राला धक्का देणाऱ्या अशा दोन घटना घडल्या आहेत. सामाजिक क्षेत्रात अनेक वर्षे कार्य करणारे महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत डॉ.गोविंद पानसरे व कर्नाटकातील थोर साहित्यिक व विचारवंत डॉ. कलबुर्गी या दोघांची निघृण हत्या करण्यात आली.

भारतातील थोर शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती डॉ. अब्दूल कलाम यांचे दि. २७ जुलै २०१५ रोजी हृदयविकाराने आकस्मिक निधन झाल्याने भारतासह अनेक देशातील लोकांना मोठा धक्का बसला. राष्ट्रपती पदावरुन निवृत्त झाल्यावरही ते अखेरपर्यंत समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम करीत होते. भावी पिढ्याचे ते मार्गदर्शक होते. त्यांच्या निधनाने एका महान व्यक्तीला आपण गमावले आहे.

कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन येथे गेल्या २० वर्षाहून अधिक काळ निरलसपणे आयुष्याच्या शेवटपर्यंत शांतिवनाच्या कामाचा ध्यास घेतलेले व कार्यरत असलेले आमचे एक सहकारी दत्ताराम मयेकर यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. शांतिवनाने आपला एक उत्कृष्ट सहकारी गमावला.

# कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन
# सन २०१४ -१५ वार्षिक अहवाल
## ✻ हीरक जयंतीकडे वाटचाल ✻

शांतिवनचे सन्माननीय सदस्य, देणगीदार, हितचिंतक,

**श्रध्दांजली** : डॉ.शांती पटेल, आर.आर.पाटील, प्रभुभाई संघवी,गोविंद पानसरे, दत्ता खानविलकर, हिरालाल बांठीया, आर.डी.महाजन, चुन्नीभाई वैद्य, पांडुरंग घरत, सुभाष देव, दत्ताराम मयेकर, महाडेश्वर, विश्वनाथ बिडये, वसंत गाढे, शंकर कदम, बबन पाटील, निरंजन बेणसे, अस्लम शेख, गंगाबाई जोगे, अजय वढावकर, विठ्ठल कांबळे, वसंत कोल्हे, पुष्पलता पाटील संस्थेशी संबंधित व कार्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या योगदान दिलेल्या मान्यवरांचे व इतर ज्ञात अज्ञात व्यक्तींचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

## आरोग्य विभाग

१) पाहणी, शिक्षण व उपचार : पनवेल तालुक्यातील ग्रामीण, शहरी, आदिवासी वाड्या व आठ पा.शि.ऊ.केंद्रांमधून सन २०१४-१५ मध्ये नवे व जुने सांसर्गिक व ६१ व असांसर्गिक ४५ असे एकूण ११४ नवीन रुग्ण शोधण्यात आले व त्यांना उपचाराखाली आण्ण्यात आले. अहवाल वर्षी एकूण १०६ रुग्णांना औषधोपचारातून मुक्त करण्यात आले. ३१ मार्च २०१५ अखेर १३ रुग्ण उपचार घेत आहेत.

२) राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण सप्ताह : दरवर्षीप्रमाणे३० जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०१५ पर्यंत महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथी निमित्त पनवेल शहरामध्ये व तालुक्यात कुष्ठरोग निवारण सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहानिमित्त गणेश कुष्ठरोग वसाहत पनवेल येथे सहसंचालक डॉ.रोकडे, जिल्हा सहा.संचालक डॉ. श्रीम.बागडे, अवैद्यकीय पर्यवेक्षक श्री.कुकडे, कौंडिण्ये, डॉ.इटकरे, श्री.उदय ठकार व इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या वेळी रेल्वे स्टेशन पनवेल परिसरात प्रदर्शन भरवण्यात आले व प्रभात फेरी काढण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन समाजसेवक श्री.अशोक आंबेकर यांनी केले.

सप्ताहाची सुरुवात प्राथमिक आरोग्य केंद्र, नेरे येथे जिल्हा सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा डॉ.श्रीम.बागडे यांनी महात्मा गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार घालून झाली. यावेळी प्राथ.आरोग्य केंद्र, नेरे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीम.अचला पाटील, वीट सेंटरच्या एएनएम, आरोग्य सेवक, आशा वर्कर व शांतिवनचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कुष्ठरोगा संबंधी जाणीव जागृती करण्यासाठी वाजे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली.

३) प्रशिक्षण : हिंद कुष्ठ निवारण संघ व कुष्ठरोग निवाारण समिती, शांतिवन यांच्या मदतीने पनवेल तालुक्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यरत असलेल्या ३२२ आरोग्य सेवक, सेविका व आशा वर्कर यांचे एक दिवसाचे कुष्ठरोग उजळणी प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणाला पनवेलचे त्वचारोग तज्ञ डॉ.दिपक कुलकर्णी, जागतिक आरोग्य संघटनेचे डॉ. रेवणकर, श्रीम.प्रतिभा काथे, श्री.उदय ठकार यांनी मार्गदर्शन केले. . .

४)	पनवेलमधील ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दिली जाते त्यांचे दर महिन्याला व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा हिंद कुष्ठ निवारण संघ व कुष्ठरोग निवारण समिती यांच्या सहकार्याने घेतले जाते. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील आदिवासी शाळांमध्ये आयडिया या संस्थेमार्फत कुष्ठरोग निवारण समिती यांच्या सहाय्याने १) सुधागड एज्युकेशन शाळा, चिंध्रण (२) चांगू काना ठाकूर विद्यालय ओवेपेठ येथे गुरुकूल वर्ग चालविण्यात येतात. यामध्ये विद्यार्थ्यांना जादा तासिका घेऊन व्यक्तिमत्व विकास, चित्रकला तसेच कुष्ठरोग निवारण या विविध विषयांवर माहिती दिली जाते.

६)	चाईल्ड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम ( सी.एस.पी.) :

जायंट ग्रुप ऑफ पनवेल, हिंद कुष्ठ निवारण संघ महाराष्ट्र शाखा व कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन यांचे तर्फे पनवेल कार्यक्षेत्रातील गरीब कुष्ठरुग्णांच्या ३२ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे जायंट ग्रुपचे अध्यक्ष श्री.अशोक शहा, माजी नगरसेवक श्री.अरविंद सावळेकर, श्री.मोतिलाल बांठिया, उपाध्यक्ष, कुष्ठरोग निवारण समिती, हिंद कुष्ठ निवारण संघाचे कार्यवाह श्री.उदय ठकार तसेच जायंट ग्रुपचे सदस्य व विद्यार्थी, पालक इ. उपस्थित होते.

७)	विकृती प्रतिबंधक उपक्रम (पी.ओ.डी.):

अ) प्राथ.आरोग्य केंद्र नेरा येथे कार्यक्षेत्रातील कुष्ठरुग्णांकरिता विकृती प्रप्रिबंधात्मक शिबीर घेण्यात आले. या शिबिराला जे.जे.रुग्णालयाचे प्लास्टीक सर्जन डॉ.अतुल शहा, डॉ. नलिनी शहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी १० रुग्णांची तपासणी केली. ज्या रुग्णांना हाताची बोटे नाहीत त्यांना ग्रीप एड, ड्रेसींग किट इत्यादी साहित्य देण्यात आले.

८) दर आठवड्याला वावंजा, नेरा, गव्हाण, आपटा, आजिवली प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी विकृती प्रतिबंध उपक्रमांतर्गत दवाखाना चालविला जातो. दर महिन्याला २७० रुग्ण या सेवेचा नियमित लाभ घेतात. याठिकाणी मसल्स स्टिम्युलेशन, वॅक्सबाथ, फिंगर गटर, ड्रेसींग किट इ. साहित्य उपलब्ध केले जाते.

९) कुष्ठरुग्णांना पायांची काळजी घेण्यासाठी विशिष्ठ अशा एम.सी.आर.चप्पलची व्यवस्था पनवेल येथील त्वचारोग तज्ञ डॉ.दिपक कुलकर्णी व मधुमेह तज्ञ डॉ.समुद्रपुर यांच्याकडे सोय करण्यात आली आहे.

१०) परिसरातील रिॲक्शन, न्युरॅटिक गुंतागुंतीचे रुग्ण यांना पुढील उपचारासाठी बॉम्बे लेप्रसी प्रोज्क्ट, मुंबई येथे पाठविले जाते. डॉ. पै व डॉ.राठोड त्यांची तपासणी करतात. पुनर्शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांना वांद्रे येथील महावीर मेडीकल रिसर्च सेंटर येथे पाठविले जाते. तेथे डॉ.सतीश आरोळकर रुग्णांवर शस्त्रक्रिया करतात.

११)	सामाजिक पुनर्वसन (सी.बी.आर.) :

कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या गावांमध्ये कुष्ठरुग्ण व्यवसाय करतात त्यांचे समाजामध्ये स्थान कायम टिकून रहाण्याकरिता हिंद कुष्ठ निवारण संघ व आर.आर.ई सोसायटी वडाळा यांचे सतत आर्थिक सहाय्य पनवेल तालुक्यातील रुग्णांना मिळत असते. यामध्ये शिलाई मशिन, चहा टपरी, किराणा दुकान, शेळी, कुक्कुट पालन, भाजीपाला शेतीकरीता मदत दिली. पनवेल तालुक्यातील नवीन व जुन्या कुष्ठरुग्णांना व्यवसाय

वाढविण्याकरीता श्रीम. प्रतिभा काथे सतत मदत करत असतात. यासाठी कुष्ठरोग निवारण समितीचे सहकार्य घेण्यात येते.

## पुनर्वसन

बऱ्या झालेल्या रुग्णांना आत्मसन्मानाने जीवन व्यतीत करण्यासाठी व त्यांचे समाजामध्ये सुयोग्य पुनर्वसन करण्यासाठी शांतिवन प्रकल्पामध्ये विविध उपक्रम चालविले जातात त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे.

**शेती** - पुनर्वसित रुग्णांना त्यांच्या आवडीनुसार शेतीमध्ये काम दिले जाते. शेतीतील मिळणारी उत्पादने संस्थेची गरज भागवुन खुल्या बाजारपेठेत विकले जाते. .

भात - चालूवर्षी ८ एकरात ४ प्रकारच्या जातीचे भात पीक घेण्यात आले. धान्य उत्पादन संस्थेच्या दैनंदिन गरजेप्रमाणे वापरुन शिल्लक राहिलेले मार्केटमध्ये विक्री करण्यात आले.

केळी - दीड एकर क्षेत्रावर केळीची १५०० झाडे उभी आहेत. यापासून मिळालेले उत्पन्न पुनर्वसित कुष्ठरुग्णांसाठी वापरुन शिल्लक उत्पादनाची पनवेल मार्केटमध्ये विक्री करण्यात आली.

भाजीपाला - दुधी, वांगी, कारली, चवळी, मिरची, पालेभाजी, शेवगा शेंग, गवार, तोंडली, शिरवली, लाल भोपळा काकडी, भेंडी, घेवडा, कोथिंबीर, पत्ता कोबी, तोंडली, वाल, टोमॅटो इत्यादी भाजीपाल्याचे उत्पादन तीन एकर क्षेत्रात घेण्यात आले. हा भाजीपाला संस्थेतील स्वयंपाकघरात दैनंदिन गरजेप्रमाणे वापरण्यात आला. त्याचप्रमाणे श्रमसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांना व पाहुण्यांना मागणीप्रमाणे विक्री करण्यात आला.

ऊस - संस्थेमध्ये रसवंती नियमित चालविण्यात येते. या रसवंतीसाठी १५ गुंठे क्षेत्रावर ऊस पीक घेण्यात आले. दररोज संस्थेस भेट देणारे पाहुणे, विद्यार्थी या रसवंतीचा लाभ घेतात. एकुण उत्पन्न रु.५०,६३०/-

**फलोद्यान** -

फळबागेखाली एकूण १५ एकर क्षेत्र आहे. त्यामध्ये हापूस आंबा, पेरु, चिक्कू, काजू, जांभूळ या झाडांची लागवड केली आहे. केळी (१.२० एकर - १५०० झाडे), पेरु (२ एकर - २२५ झाडे), चिक्कू (२० गुंठे - ३५ झाडे), नारळ लागवड करण्यात आली आहे.

**रोपवाटिका** :

रोपवाटिकेमध्ये शोभिवंत झाडांची तसेच वनराई रोपांची जपणूक करुन त्याची विक्री करण्यात येते.

**विणकाम** :

व्यंगत्व आलेल्या पुनर्वसित कुष्ठरोगमुक्त व्यक्तींना प्रशिक्षण देऊन स्वावलंबी जीवन जगण्यासाठी विणकाम विभागात सतरंज्या, शबनम, डस्टर, आसने इ. विणण्याचे काम २४ स्त्री - पुरुष करतात. या टिकाऊ वस्तुंना खूपच मागणी असते, या उत्पादनांची विक्री मुंबई ग्राहक पंचायतीने आयोजित केलेल्या ठाणे, बोरिवली, गोरेगांव, येथील प्रदर्शनात केली जाते. डोंबिवली जिमखानाने आयोजित केलेल्या उत्सव कार्यक्रमात विणकाम उत्पादनाची विक्री केली जाते. डोंबिवली येथील संस्थेचे हितचिंतक श्री.ढमढेरे या कार्यक्रमासाठी नियमित सहकार्य करतात. दरवर्षी ठाणे येथील गणेश उत्सवामध्ये संस्थेचे हितचिंतक श्री.प्रसाद ठकार स्वतंत्रपणे स्टॉल लावून उत्पादनांची विकी करतात.

**<u>शिवणकाम</u> :**

शिवण विभागात निवासींचे कपडे, आश्रमशाळा विद्यार्थ्यांचे गणवेश तसेच ज्युट बॅगा, शबनम, डस्टर्स इ. शिवणकाम केले जाते.

**<u>गोशाळा</u> :**

विनोबा गोशाळा ८१८६ लि. व साई गोशाळा ८१५६ लि.मिळून एकूण १६३४२ लिटर्स दुध उत्पादन मिळाले. या दुधाचे वाटप कुष्ठरुग्ण, पेशंट भोजनालय, व कार्यकर्त्यांना करण्यात आले. या शिवाय शेतीला शेणखत व मुत्रखत मिळाले. गोशाळेत दुभत्या गाई, कालवड, बैल, खोंड, वासरे, भाकड जनावरे आहेत. (परिशिष्ठ क्र. ३ पहावे)

## <u>प्रचार व प्रसिध्दी</u>

**<u>श्रमसंस्कार शिबिरे</u> :**

आपणाला परिचित असणारे मुंबई आकाशवाणी येथील कार्यक्रम संचालक, कोकण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ कविवर्य श्री. महेश केळुसकर यांच्या हस्ते श्रमसंस्कार शिबीर मालिकेचे उद्‌घाटन दि. १४ नोव्हेंबर २०१४ रोजी संस्थेचे पदाधिकारी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात झाले. पाहुण्यांनी व संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना तीन दिवसांच्या मुल्याधिष्ठित शिबीरातून बहुमोल मार्गदर्शन केले. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत २१ शाळा व महाविद्यालयांनी सहभाग घेतला. एकूण १०,४४३ विद्यार्थी, १४३ प्राध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी लाभ घेतला. विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास साधण्याच्या दृष्टीने त्यांना व्यायाम, श्रमदान, आकाश निरीक्षण, सर्प व पर्यावरणाचे महत्व पटवून देणे, सांकृतिक कार्यक्रम व कुष्ठरोगाबद्दल शास्त्रोक्त माहिती देणे यामुळे कुष्ठरोगाबद्दल समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी मदत होत आहे. या शिबिरांमध्ये मार्गदर्शन करणाऱ्या सर्व मार्गदर्शकांचे संस्थेच्यावतीने आभार.

दरवर्षीप्रमाणे कै. हरिभाऊ दामले यांच्या स्मृती प्रित्यर्थ शिबिरात सहभागी झालेल्या शाळांमधून आदर्श महाविद्यालय, उत्कृष्ट शिक्षक, , उत्कृष्ट सेवक व , उत्कृष्ट विद्यार्थी यांची निवड करुन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुंबई महाविद्यालयांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम चालविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत शांतिवन येथे सन २०१४-१५ मध्ये १० महाविद्याल यांची ७-७ दिवसांची शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी श्रमदानातून शांतिवनाला आवश्यक विविध उपक्रम राबविले. तसेच विविध विषयांवरील व्याख्यानेही आयोजित करण्यात आली.

समाजामधील कुष्ठरोगाबद्दलचे गैरसमज दूर करण्याच्या दृष्टिने इतर समाजातील व्यक्ती व कुष्ठरुग्ण बंधु भगिनी यांना एकत्र आणून निरनिराळ्या कार्यक्रमांतून प्रबोधनाचं कार्य दरवर्षी करण्यात येते ते पुढीलप्रमाणे.

<u>रक्षाबंधन</u> : दि. १० ऑगस्ट २०१४ रोजी शांतिवनामध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. एस.टी.गडदे होते. प्रा.काकासाहेब ढवळे, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्रा. परीट, विद्यार्थी, विद्यार्थिनी, सी.के.टी.कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच जायन्ट ग्रुप, पनवेलचे पदाधिकारी, आश्रमशाळेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी

व शिक्षक, शांतिवनातील कुष्ठरुग्ण बंधु भगिनी, पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते. या कार्यक्रमामुळे येथील निवासींचा आनंद व्दिगुणित झाला.

याप्रसंगी सी.के.टी.महाविद्यालयाने खाऊ वाटप केले व आश्रमशाळेसाठी वह्या दिल्या.

हळदी कूंकू :- श्रीमती उषाताई जाधव याच्या मार्गदर्शनाखाली शांतिवनमधील भगिनींनी हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात पार पाडला.

गणेशोत्सव ;- विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन दहा दिवसांचा गणेशोत्सव आनंदात पार पडला .यावर्षी श्री. गणेशाची मुर्ती सौ. आश्विनी पाटील यांनी दिली. कार्यक्रमात सर्व शांतिवन निवासी सहभागी झाले होते.

**मित्र मेळावा** :

रविवार दि. २७ जानेवारी २०१७ रोजी शांतिवन वार्षिक मित्र मे ळावा संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या मित्र मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक लोकमतचे मुख्य संपादक श्री. विजय कुवळेकर व बॉम्बे लेप्रसी प्रोजेक्ट, मुंबईचे डायरेक्टर डॉ. व्ही. व्ही. पै. उपस्थित होते.

या मित्र मेळाव्याच्या निमित्ताने शांतिवनातील मालती श्रीराम चिंचलीकर बालवाडी येथील महात्मा गांधीजींच्या पुतळ्याचं अनावरण प्रमुख पाहुणे डॉ. विजय कुवळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. शांतिवनातील नुतनीकरण केलेल्या मध्यवर्ती कार्यालय व पुनर्वसन कक्षाला अनुक्रमे कै.डॉ.रामचंद्र वारदेकर व आद्य कुष्ठसेवक कै.मनोहरजी दिवाण यांच्या नामफलकाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे डॉ. व्ही.व्ही.पै यांच्या हस्ते करण्यात आले. या मित्र मेळाव्यात प्रमुख पाहुण्यांनी समयोचित मनोगते व्यक्त करुन उपस्थित श्रोत्यांचे प्रबोधन केले.

दुपारच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पुण्याच्या प्रसन्ना इनव्हेंटस् या संस्थेतर्फे मराठी हिंदी गीतावर आधारीत स्वरानुभुती हा कार्यक्रम विनामूल्य आयोजित केला. या कार्यक्रमाला मुंबई, ठाणे, येथील शांतिवन मित्र मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. या मित्र मेळाव्याच्या नांव नोदणीसाठी सर्वश्री आर.ए.देसाई, केसरीनाथ पाटील, सदानंद आपटे,राजेश पालशेतकर, विनायक शिंदे, गोविंद काजरोळकर, मुकूंद भुसारी, अरविंद मालपाठक, प्रभाकर गोडसे, संजय पाटील, विनोद चाळके व श्रीम.शरयु धाडी, निलीमा येवलेकर, सुरेखा तावडे यांनी दरवर्षीप्रमाणे सहकार्य केले.

**भाऊबीज** : दरवर्षीप्रमाणे यावर्षी शांतिवनात भाऊबीज कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व शांतिवनचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै.वसंत (बाबुराव) मोदगी यांनी भाऊबीज कार्यक्रम सुरु केला. त्यांनी उभ्या केलेल्या निधीतून सर्व कुष्ठरुग्ण बंधु भगिनींना भेट देण्यात आली.

## इतर उपक्रम

**पाळणाघर - बालवाडी** : कुष्ठरुग्ण व कार्यकर्त्यांच्या मुलामुलींसाठी पाळणाघर/बालवाडी आहे. येथे अहवाल वर्षात ८ मुलं होती.

**स्नेहलता निसर्गोपचार केंद्र** :

स्नेहलता निसर्गोपचार केंद्र हे आता महाराष्ट्रात तसेच इतर राज्यात सर्वत्र परिचित झाले आहे. निरनिराळ्या अनेक जिल्ह्यातून, मुंबईच्या परिसरातून, तसेच दक्षिण महाराष्ट्रातुन मधुमेह, पक्षाघात, संधिवात,

लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, त्वचारोग इ. अनेक रोगांनी त्रस्त लोक इथे उपचाराला येतात. निसर्गरम्य वातावरणातील उपचार घेऊन ते समाधानाने आणि प्रसन्न चित्ताने घरी परत जातात. आवश्यक त्या निसर्गोपचाराच्या सर्व सोयी, सुविधा असलेले सुसज्ज असे हे केंद्र आहे. साधेसुधे पण प्रशस्त उपचारगृह, योग साधनाही आहे. स्त्री व पुरुष वेगवेगळे उपचार विभाग आहेत. एका बी.एन.वाय.एस.निवासी वैद्यकीय चिकित्सकाची येथे नेमणूक केलेली आहे. येथील स्त्री व पुरुष उपचारक अनुभवी तज्ञ आहेत. आहार चिकित्सा, माती चिकीत्सा, जल चिकित्सा, मसाज चिकित्सा, सूर्यस्नान चिकित्सा व आवश्यकतेनुसार लंघन चिकित्सा इ. उपचार पध्दतींनी येथे उपचार केले जातात.

स्नेहलता निसर्गोपचार आश्रमाचे अेक केंद्र पनवेल येथे चालविले जाते. या केंद्रात बाह्यरुग्ण उपचार पध्दतीने कटिस्नान, बाष्पस्नान, मसाज, एनिमा इ. उपचार दिले जातात. पनवेल व परिसरातील लोकांची चांगली सोय त्यामुळे झालेली आहे.

अहवाल वर्षात एकूण आंतररुग्ण विभागात २६१ तर बाह्य रुग्ण विभागात एकूण १८३ रुग्णांनी उपचार घेतले.

<u>रामकृष्ण निकेतन (वृध्दाश्रम)</u> :

१९८६ मध्ये प्रायोगिक तत्वावर तीन खोल्यांमध्ये चालु केलेल्या या वृध्दाश्रमात आता ४० निवासींची सोय होईल अशा दोन सुसज्ज इमारती, कै. लिलाताई चव्हाण व बळवंत चव्हाण यांच्या देणगीतुन तसेच लायन्स क्लब मुंबई व इंटरनॅशनल लायन्स क्लब यांच्या सहकार्याने उभे असलेले कम्युनिटी सेंटर हे आजचे रेखीव स्वरुप आहे. वृध्दाश्रम ही संसारात केलेली तडजोड असते. त्यामुळे काही येतात, काही काळाआड होतात पण काळाची गरज म्हणून वृध्दाश्रम चालूच रहातो. कोणत्याही प्रकारची जाहिरात न देता सांगोवांगी जे येतील त्यांना सांभाळणे व मानाने जगण्याची उर्जा देणे, त्यांच्या घराची आठवण न होऊ देणे ही उद्दिष्टेमबाळगून वृध्दाश्रम चालविणे हे आमचे व्रत आहे. एकूण ३६ निवासी सध्या वृध्दाश्रमात आहेत.

वर्षातील सर्व सण, निवासींचे वाढदिवस, छोट्यामोठ्या सहली, भजन, संगिताचे व मनोरंजनाचे कार्यक्रम अशा प्रकारे दैनंदिन जीवनात निवासींना घरची उणीव भासू नये अशी काळजी घेतली जाते. डॉ.कनवाडे व डॉ. पटेल यांनी आठवड्यातून एक दिवस भेट देऊन येथील निवासींना गरजेप्रमाणे वैद्यकीय सेवा दिली. अनेक सुहृद व हितचिंतक वृध्दाश्रमास भेट देऊन सहकार्य करत असतात. या रामकृष्ण निकेतनची व्यवस्था श्रीम. विद्याताई साळवे पहातात. तेथील एक निवासी श्री.स्वामीदास कामत आवश्यक सेवा, व्यवस्थापनात सहकार्य करतात.

<u>राजीव-रजन आधारघर</u> :

राजीव रजन लाड ट्रस्ट यांनी कुष्ठरोग निवारण समिती यांना दिलेल्या देणगीतुन राजीव रजन आधारघर हा उपक्रम २० नोव्हेंबर १९९७ पासुन सुरु केला आहे . शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या विकलांगता असलेल्या व्यक्तींची देखभाल राजीव रजन आधारघरामध्ये केली जाते. या विभागामध्ये ६६ निवासींची व्यवस्था आहे. परंतु काहीवेळा यामध्ये वाढही होऊ शकते. आतापर्यंत स्त्री पुरुष अशा ५२५ व्यक्तींनी या राजीव रजन

आधारघराचा लाभ घेतला आहे. या निवासींची वैद्यकीय तपासणी करण्यात येते. पनवेल येथील डॉ.राजेंद्र पटेल हे निवासींच्या वैद्यकीय सेवेसाठी नियमित भेट देत असतात. ज्या निवासींना मानसिक उपचाराची आवश्यकता असते अशांना मानसोपचार तज्ज्ञ डॉ.मनोज भाटवडेकर, मुंबई व डॉ.पाटकर पनवेल यांची मसत घेतली जाते. इनरव्हील क्लब डिडस्ट्रिक्ट ३१४ ने येथील निवासींसाठी बेड लॉकर्सची भेट दिली. तसेच इनरव्हील क्लब ऑफ मुलूंड यांच्यावतीने विविध उपक्रम राबविले जातात. श्री स्वामीदास कामत यांचाही मदतीचा हात मिळतो..

राजीव-रजन लाड ट्रस्टचे विश्वस्त, इनरव्हील मेंबर्स, रोटरी व लायन्स क्लब मेंबर्स तसेच इतर मान्यवरांनी केंद्राला वेळोवेळी भेट देऊन समाधान व्यक्त केलेले आहे. राजीव - रजन आधारघर या सर्वांप्रती कृतज्ञ आहे.

राजीव रजन आधारघराची व्यवस्था संस्थेच्या विश्वस्त व कार्याध्यक्षा श्रीमरी मीराताई लाड पहातात. त्यांना सहाय्य करण्यासाठी १८ कार्यकर्ते कार्यरत आहेत.

**<u>बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र</u> :**

बलवंतराय मेहता केंद्रा तर्फे संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त व उपाध्यक्षा श्रीमती रक्षा मेहता यांच्या अध्यक्षतेखाली विविध प्रकारचे उपक्रम शांतिवन येथे व आजूबाजूच्या खेड्यात चालविले जातात. या उपक्रमांसाठी इनरव्हील क्लब डि.३१४ मधील सर्व क्लब्स, रोटरी क्लब, इंडियन रेड क्रॉस सोसायटी यांचे आर्थिक सहकार्य मिळते. अहवालवर्षी पुढील विविध उपक्रम राबविण्यात आले.

<u>इनरव्हील क्लब डिस्ट्रिक्ट ३१४ यांनी सुरु केलेल्या उपक्रमांचा उद्‌घाटन कार्यक्रम</u> -

दि.१७ जानेवारी २०१५ रोजी इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३१४ यांच्यावतीने राजीव रजन आधारघर येथे बेडसाईड लॉकर्स, श्रमसंस्कार विभागासाठी मुलांसाठी स्नानगृह व शौचालये, आदिवासी आश्रमशाळेतील मुलींसाठी सामान ठेवण्यासाठी शेल्फ व मुलामुलींसाठी स्वच्छतागृह इत्यादी व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमाच्या उद्‌घाटनासाठी श्रीम.आभा गुप्ता, अध्यक्षा, इंटरनॅशनल इनरव्हील क्लब, श्रीम.हिमाद्री नानावटी, चेअरमन, इनरव्हील क्लब डि. ३१४, श्रीम. पुष्पा सुर्यमूर्ती, चेअरमन, रुरल प्रोजेक्ट समिती तसेच श्रीम.रक्षा मेहता, संस्थेचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर धर्माधिकार व, इतर पदाधिकारी, कार्यकर्ते शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

**<u>पाणी पुरवठा योजना</u>** - वांगणी भेकरे येथे पाणी पुरवठा योजनेची व्यवस्था करण्यात आली आहे.

**<u>शौचालय योजना</u>** - गावांची स्वच्छता रहावी, गावात रोगराई पसरु नये यासाठी गावातील लोकांच्या सहकार्याने तसेच इंडियन रेड क्रॉस सोसायटी, सिटी ब्रँच मुंबई, इंडियन मर्चन्टस् चेंबर्स लेडीज विंग यांच्या अर्थ सहाय्याने वांगणी भेकरे ३७ शौचालये, अंबे गाव २५ शौचालये, गाडेश्वर ४६ शौचालये अशी वैयक्तिक व्यवस्था करण्यात आली.

**<u>शैक्षणिक प्रकल्प</u>** -

गाडेश्वर येथे ८ वी ९ वी व इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी समाज मंदिरात शैक्षणीक वर्ग दर शनिवार, रविवारी चालविले जातात. याची जबाबदारी श्री.चौधरी व श्री. जाधव गुरुजी यांनी स्वीकारली आहे.

गाडेश्वर येथे १० महिलांसाठी शिवणवर्ग चालविण्यात आला. याची जबाबदारी श्रीम. रसिका फडके

यांनी स्वीकारली आहे.

नेचर ऑफ आर्ट - गाडेश्वर समाज मंदिर येथे इ. ६, ७ व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी श्री. विजय पोतदार व श्रीमती दया जाधव यांनी नदीतल्या दगडांवर चित्र काढण्याचे व पेंटींगचे प्रशिक्षण दिले.

शिबिरे -

सर्व शिक्षा अभियानांतर्गत २६ ते २८ मे २०१४ या कालावधीत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे शिबीर घेण्यात आले.

जल शुध्दीकरण व त्याचे व्यवस्थापन या संदर्भात १४ गावातील ८३ ग्रामस्थांसाठी एस.आय.ई.एस.इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एम्प्लायमेन्ट मॅनेजमेन्ट, नेरुळ या संस्थेतर्फे एक दिवसाचे शिबीर घेण्यात आले.

निर्मित एड्युसोल प्रा. लि. या संस्थेतर्फे व्यक्तिमत्व विकासाचे शिबीर घेण्यात आले.

राष्ट्रीय केमिकल व फर्टिलायझर कंपनी यांच्यातर्फे शांतिवन तसेच आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांचे एक दिवसीय शिबीर शांतिवनात घेण्यात आले. तसेच राष्ट्रीय केमिकल व फर्टिलायझर कंपनी, थळ येथे परिसरातील शेतकऱ्यांसाठी तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिराला २५ शेतकरी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुका समन्वयकांचे तीन दिवसीय शिबिर घेण्यात आले. ईशान्य फाऊंडेशन यांच्यातर्फे शेतकरी महिलांसाठी एक दिवसाचे शिबिरघेण्यात आले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत रायगड जिल्हा परीषदेच्या वतीने दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री.अरविंद म्हात्रे, युनिसेफचे प्रतिनिधी श्री.जयवंत देशपांडे, श्री. कुमार खेडकर, श्री.जयवंत गायकवाड समन्वयक इत्यादी उपस्थित होते.

राष्ट्रीय खेळ व कराटे संघ यांच्यातर्फे तीन दिवसांचे शिबिर घेण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक व सांस्कृतिक आदानप्रदान अंतर्गत तैवान विद्यापीठ येथील विद्यार्थ्यांनी शांतिवनला भेट दिली. सदर विद्यार्थ्यांनी १० दिवस राहून संस्थेची आश्रमशाळा, विविध प्रकल्प व आजुबाजूच्या खेड्यात भेट देऊन येथील जीवनाची माहिती घेतली. त्यांनी आश्रमशाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासाठी करमणुकीचे कार्यक्रम केले.

## श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आदिवासी आश्रमशाळा

श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आदिवासी आश्रमशाळा येथील सर्व उपक्रम व्यवस्थित चालावेत, तसेच शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शाळा समिती स्थापन करण्यात आली आहे. या शाळा समितीचे अध्यक्ष पद श्रीम. रक्षा मेहता यांनी स्वीकारले असून संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सदस्य आहेत. या शाळा समितीची सभा घेण्यात येऊन विविध प्रश्नांचे निराकरण करण्यात येऊन, शाळेची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विद्या परिषद सभा घेण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी इयत्ता १ ली मध्ये २७ मुलगे व २२ मुली अशी एकूण ४१ विद्यार्थी व १ अनिवासी विद्यार्थी अशा एकूण ५८ नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश दिण्यात आला शैक्षणिक वर्ष मार्च २०१४ मध्ये

घेण्यात आलेल्या १० वीच्या परीक्षेचा निकाल जूनमध्ये जाहीर झाला एकूण८२.१२% विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सहशालेय उपक्रम :

मूल्यशिक्षण व्यक्ती विकासाचा पाया असतो हे मुल्यांचे महत्व जाणून म. गांधी, विनोबा भावे, डॉ.बाबासाहेब अंबेडकर, साने गुरुजी, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे इत्यादी महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात येऊन त्यांचे विचार विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी तसेच त्यांच्या कला, गुणांची वाढ करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला, मातकाम, रांगोळी, मनोरंजन खेळ, हस्ताक्षर स्पर्धा, वृक्षारोपण असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, लँग्वेज लॅब, संगणक प्रशिक्षण इत्यादी व्यवस्था करण्यात आली आहे.

आरोग्य तपासणी : प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच फिरते आरोग्य पथक, पेण येथील वैद्यकीय अधिकारी व आश्रमशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी मुला-मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ येथील डॉक्टर आठवड्यातून तीन वेळा किरकोळ आजारी विद्यार्थ्यांची तपासणी करुन व औषधोपचार करतात.

क्रीडा स्पर्धा : दि. ११/११/२०१४ ते दि.१२/११/२०१४ या कालावधीत शालेय स्तरावर वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दि. २२ ते २४ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन पाथरज, ता.कर्जत येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी आपल्या शाळेतील एकूण ४५ मुले सहभागी झाली होती. प्रकल्पातून मुलींच्या खो-खो संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले तसेच तीन मुलींनी धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

सदर विजयी विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

विविध स्पर्धा परीक्षा : दि.२/१०/२०१४ रोजी गांधी रिसर्च फाऊंडेशन तर्फे गांधी विचार संस्कार परीक्षा घेण्यात आली. एकूण इ.५ वी ते ९ वी मधील ५८ विद्यार्थी बसले होते. सदर स्पर्धेमध्ये सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कु.सोनाली संतोष पाटील हिला जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

इ.७ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये कुमार पांडुरंग गौऱ्या चौधरी याला शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरविण्यात आले. विद्यार्थी विकास संस्था, हडपसर, पुणे यांच्या अंतर्गत हस्ताक्षर व चित्र रंग भरण स्पर्धा घेण्यात आली होती. त्यातही सर्व विद्यार्थ्यांचा उत्कृष्ठ सहभाग मिळाला.

आपल्या आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यश संपादन करतात.

पालक सभा : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये एकूण ४ पालक सभा घेण्यात आल्या. सदर सभांमध्ये पालकांना मुलांच्या शैक्षणिक व आरोग्याबाबत सूचना देण्यात आल्या. सदर सभा मुलांच्या मोठ्या सुटीच्या वेळी घेण्यात आल्या.

शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी : वर्ष २०१४-१५ मध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण या कार्यालयातील पदाधिकारी सर्वश्री आर.एन.सांबरे, आर.डी.महाजन, ए.एस.पाटील, एस.एस.जोहरे,

व्ही.एन.भडवांवकर, प्र.ना.वडगाये, एस.एस.वाटेकर, एस.व्ही.साळुंखे, यांनी वेळोवेळी शाळेला भेट देऊन, मार्गदर्शन केले. शाळेची माहिती घेतली व कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.

<u>शैक्षणिक सहली</u> : लहान मुलांची वर्षा सहल चिंचवली खडकावर नेण्यात आली होती. तसेच मोठ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल कोल्हापूर व परीसर दर्शनासाठी नेण्यात आली होती. सहलीसाठी १०४ विद्यार्थी, ६ शिक्षक व ४ शिक्षकेत्तर कर्मचारी गेले होते. दोन बस करण्यात आल्या होत्या.

**<u>साने गुरुजी वाचनालय</u> :**

शासकीय ग्रंथालयाच्या मान्यतेने **संस्**थेतर्फे हे ग्रंथालय चालविण्यात येते. वाचनालयात एकूण ५१५० पुस्तके, ११ वर्तमानपत्रे, ५ साप्ताहिके, ३ पाक्षिके, ८ मासिके, २० दिवाळी अंक नियमित आणले जातात. वाचन संस्कृति वाढण्याच्या दृष्टीने सभोवतालच्या गावातून, वाड्यांमधुन वाचकांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अहवालवर्षी ५७३० वाचकांनी वाचनाचा लाभ घेतला. सौ.लिलाताई बोपटकर यांनी पुस्तके भेट दिली आहेत. तसेच वारंवार वीज जात असल्यामुळे होणारी अडचण लक्षात घेऊन श्री.भावेन शहा यांनी वाचनालयास एक इन्व्हर्टर भेट दिला. दि. ११ जून रोजी साने गुरुजी पुण्यतिथी व २४ डिसेंबर रोजी साने गुरुजींची जयंती साजरी करण्यात आली. या दोन्ही कार्यक्रमांना संस्थेचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी उपस्थितांना साने गुरुजींच्या कार्याविषयी विस्ताराने माहिती दिली.

**<u>शांतिवन नागरी सहकारी पतसंस्था</u> :**

अहवालवर्षी पतसंस्थेच्या ०१ मासिक सभा झाल्या. संस्थेचे भाग भांडवल रु. १५,६५० इतके आहे. एकूण सभासद संख्या २१७ आहे. सभासदांच्या बचत ठेवींची रक्कम रु. १,६६,३१६ आहे. आवर्त ठेवी रु.३,१५,०२५ तर मुदत ठेवी रु. ४,५०,८०६ आहेत. अहवालवर्षी सभासदांना रु. ३,२०,००० चे कर्ज वाटप केले आहे. . घरबांधणी, लग्न कार्य, शिक्षण व गृहोपयोगी साहित्य इ. साठी कर्ज वाटप झालेले आहे.

**<u>शांतिवन सहकारी ग्राहक संस्था</u>** :

शांतिवन सहकारी ग्राहक संस्थेची स्थापना १९९० मध्ये करण्यात आली. संस्थेचे हे २५ वे वर्ष आहे. परिसरातील व शांतिवनातील लोक किराणामाल व जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी येतात.. रु.६०,००,०००/- पर्यंत संस्थेची वार्षिक उलाढाल होते. संस्था रास्त भाव रेशन धान्य दुकान चालविते. शासनाने ठरवून दिलेल्या प्रत्येक कार्डधारकाला रेशनवरील धान्य पोहचविण्याचे काम संस्था करत आहे. संस्थेचे चालू वर्षात २०६ सभासद आहेत. रु.१००/- च्या वर रोख खरेदी करणाऱ्या ग्राहकांना संस्था बिलातून ५% सुट देते. संस्थेत ५ बरे झालेले कुष्ठरुग्ण बांधव व त्यांच्या परिवारातील मंडळी काम करतात. संस्थ सभासदांना १२% लाभांश देते. संस्था **ना नफा ना तोटा** या सहकार तत्वावर काम करीत आहे. संस्था दिवसेंदिवस प्रगती पथावर आहे . संस्थेस गेल्या दोन वर्षापासुन **अ** वर्ग प्राप्त झालेला आहे.

**<u>विश्वस्त व कार्यकारिणी सभा</u>** :

अहवाल वर्षमध्ये विश्वस्तांच्या २ व कार्यकारी मंडळाच्या ११ सभा झाल्या.

**<u>आर्थिक विवेचन</u>** :

सन २०१४-१५ मध्ये मागील वर्षाप्रमाणे संस्थेने प्रभावीपणे कार्य सुरु ठेवले आहे, हे आर्थिक पत्रकाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास आपल्या लक्षात येईल.

नेहमीप्रमाणे बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र, राजीव-रजन आधारघर व रामकृष्ण निकेतन-वृध्दाश्रम, श्रमसंस्कार शिबीर, मित्र मेळावा हे विभाग स्वयंपूर्ण असून यांचे उत्पन्न स्थिर आहे. निसर्गोपचार केंद्राकडे जास्त लक्ष पुरवल्यास त्यामधून भरीव उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. शेती विभागाने चालू वर्षात भात शेती व भाजीपाला व्यवस्थापनात उत्तम कामगिरी केली आहे. पण वाढती मजुरी, बाहेरुन आणण्यात आलेल्या मजुरांची मजुरी यामुळे शेती विभागाच्या निव्वळ उत्पन्नामध्ये खूपच घट झाल्याचे लक्षात येते. तर विणकाम विभागातही उत्पन्न कमी झाले आहे. याबाबत योग्य ती उपाय योजना करणे आवश्यक आहे.

चालूवर्षामध्ये महाराष्ट्र शासनाने रुग्णांचे आरोग्य व पुनर्वसन अनुदानात भरीव वाढ केली आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षात त्या विभागाची तूट कमी होण्यात मदत होईल.

संस्थेला विशिष्ट उद्देशांसाठी मोठ्या प्रमाणांत देणग्या मिळतात. त्यापैकी कमीत कमी ८५% रक्कम उद्देशावर खर्च करण्याची जबाबदारी संस्थेची आहे. त्यासाठी परिणामकारक आर्थिक नियोजन व शिस्तीची अत्यंत गरज आहे. भविष्यात काटेकोर नियोजन न केल्यास संस्थेचा आर्थिक डोलारा कोसळू शकतो याकडे मी आपले सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. शाळा, कॉलेज, सामाजिक संस्था यांनी संस्थेला भेट देऊन विविध उपक्रमाची माहिती घेतली व कामाला शुभेच्छा दिल्या. सर्वांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**<u>समारोप आभार</u>**

६० वर्षांच्या कालखंडामध्ये कुष्ठरोग निवारण समितीने ध्येय व कार्याने समाजामध्ये आपला एक लौकिक निर्माण केलेला आहे. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी, विश्वस्त यांच्या योगदानाची नोंद यासाठी घ्यावीच लागेल (ज्यांनी शांतिवनच्या ओसाड जमिनीमध्ये आपल्या कष्टांनी, संस्कार शिबिराच्या विद्यार्थ्यांनी नंदनवन उभे केले). महाराष्ट्र शासन, आमचे देणगीदार यांनी प्रसन्न वृत्तीने आर्थिक सहयोग दिला. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आमचे कर्तव्य आहे. संस्थेचे बहुसंख्य पदाधिकारी, कुष्ठरुग्ण वयस्कर होत आहेत. भूक. शोषण, बेरोजगारी, हिंसा, आतंकवाद, पर्यावरणाचा ऱ्हास, अणवस्त्र मुक्ती यासाठी जगभरातील समाजशास्त्रज्ञ याचे उत्तर म.गांधीमध्ये शोधत आहेत. २ ऑक्टोबर हा गांधिजींचा जयंती दिन जगातील अनेक देशातून अहिंसा दिन म्हणून साजरा केला जात आहे. अशावेळी कुष्ठरोग निवारण समितीची जबाबदारी आहे की, गांधीजींचे शिष्य, अंत्यवासीनी ६० वर्षापूर्वी ज्या ध्येयवादाने संस्थेची मुहूर्तमेढ रोवली त्यांना अधिक क्षमता, सक्रियतेने, नव्या जोमाने भविष्यातील वाटचाल करावी लागेल.

| विष्णु प्रभुदेसाई | उदय ठकार | सौ. मीराताई लाड |
|---|---|---|
| प्रमुख कार्यवाह. | कोषाध्यक्ष | कार्याध्यक्षा |

## परिशिष्ट क्र. १.१

## कुष्ठकार्याचा सन २००१४-२०१५ मधील संक्षिप्त तपशील

## (पाहणी, शिक्षण व उपचार)

### कार्यक्षेत्र : पनवेल तालुका एकूण लोकसंख्या

### गावांची संख्या : १८५, मुख्य केंद्रे : ८, उपकेंद्रे : ३६

